नि.दि.दा.क्र. ३१/२०१६
बजरंग वि. जावेद खॉ
निशाणी क्र. ३९ क्रमश :

**वादीतर्फे साक्षीदार क्र. १ यांचा पुढील सरतपास वादीचे वकिल श्री डी.एम.कुटे यांचे मार्फत शपथेवर सुरू —**

**१३.** मी माझे पुराव्याचे शपथपत्र वाचले आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा आहे.

**१४.** मी या प्रकरणात निशाणी ४ या कागदपत्राच्या यादीसोबत अ.क्र. १ ला माझे व प्रतिवादीच्या दरम्यान झालेल्या दिनांक २७.०५.२०१५ रोजीच्या गाडी विक्रीच्या करारनाम्याची छायाप्रत दाखल केली आहे. मी निशाणी ३३ हा अर्ज दाखल करून सदर करारनाम्याबाबत दुयम पुरावा देण्यास न्यायालयाची परवानगी घेतली आहे. सदर करारनाम्यावर माझी व प्रतिवादीची सही आहे. तसेच त्यावर तीन साक्षीदारांच्या सहया आहेत. तसेच त्यावर नोटरी श्री पुराडउपाध्ये यांची सही व शिक्का आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी ४३** देण्यात येते. तसेच सदर कागदपत्राच्या यादीसोबत अ.क्र. २ ला मला प्रतिवादीने त्यांचे वकीलांच्या मार्फत मला दिनांक ०१.१०.२०१५ रोजी पाठविलेली नोटीस दाखल केली आहे. त्यास **निशाणी ४४** देण्यात येते. तसेच सदर कागदपत्राच्या यादीसोबत अ.क्र. ३ ला मी माझे वकीलांच्या मार्फत दिनांक २७.०१.२०१६ रोजी प्रतिवादीला पाठविलेल्या उत्तराच्या नोटीसीची स्थळप्रत दाखल केली आहे. त्यावर माइया वकीलांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी ४५** देण्यात येते. सदर निशाणी ४५ या नोटीसीबाबतची पोस्टाची पावती व सदर नोटीसीचा परत आलेला लिफाफा मी निशाणी ४ कागदपत्राच्या यादीसोबत अ.क्र. ४ व ५ ला दाखल केला आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. सदर नोटीसीचा लिफाफा या क्षणी उघडुन पाहण्यात आला. त्या नोटीसीबाबतच्या पोस्टाच्या पावतीला **निशाणी ४६** व परत आलेला लिफाफा आणि त्यातील नोटीस याला एकत्रितरित्या **निशाणी ४७** देण्यात येते. तसेच सदर कागदपत्राच्या यादीसोबत अ.क्र. ६ ला मी पोलीस स्टेशन अकोट शहर येथे दिनांक १३.०९.२०१५ रोजी दिलेल्या कैफीयतीची स्थळप्रत आणि अ.क्र. ७ ला त्या कैफीयतीच्या अनुषंगाने मला मिळालेले समजपत्र दाखल केले आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास अनुक्रमे **निशाणी ४८ व ४९** देण्यात येते.

**१५.** मी निशाणी २० या कागदपत्राच्या यादीसोबत अ.क्र. १ ला मला

चोलामंडलम इन्वेस्टमेंट व फायनान्स कंपनीने दिनांक ०१.०६.२०१६ रोजी पाठविलेली नोटीस आणि अ.क्र. २ ला त्या नोटीसीचा खाली लिफाफा दाखल केला आहे. त्यास अनुक्रमे **निशाणी ५० व ५१** देण्यात येते.

**१६.** तसेच मी निशाणी ४१ या कागदपत्राच्या यादीसोबत अ.क्र. १ ला सातबारा उतारा दाखल केला आहे. त्यास **निशाणी ५२** देण्यात येते.

**सरतपास संपला.**

**उलटतपास प्रतिवादीच्या वकीलांच्या तोंडी विनंतीवरून पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

माझे समक्ष/श्रवणोत्तर स्विकृत,

स्वा/—

दि. २८.०२.२०२५.

( महेश एस. काळे )

**दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अकोट**